# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ४६३ /२०२२**

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक यांना शैक्षणिक विभाग (संलग्नता) यांचे पत्र क्र. सीए/१३७२, दि. २३/०८/२०२२ अन्वये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये नाव, पदनाम, दूरध्वनी क्रमांक/मोबाईल नंबर, ई–मेल आयडी, प्राचार्य/संचालकांचा दूरध्वनी क्र./मोबाईल नंबर इत्यादीसहीत चुकीची माहिती भरली असल्याने अथवा अद्ययावत केलेली नसल्याने वेळेवर संपर्क होत नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. तसेच सदर संपूर्ण माहिती अचूक व अद्ययावत करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालयांमध्ये विहित पध्दतीचा अवलंब करून अथवा निवड समितीद्वारे नेमणूक करण्यात आलेल्या प्राचार्य/संचालक/अध्यापकांना विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठ संकेतस्थळावरील त्यांच्या महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये सदरच्या मान्यतेची माहिती अचूक भरणे व अद्ययावत करणे आवश्यक आहे. तथापि, काही महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयीन प्रोफाईलमध्ये अद्यापही सदर माहिती अद्ययावत केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. एवढेच नव्हेतर काही महाविद्यालयांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये विद्यापीठ मान्यता नसलेल्या अध्यापकांच्या नावाचाही समावेश केलेला दिसून येत आहे. सदरचे कृत्य हे फसवणूक व दिशाभूल करणारे असून त्यामुळे विद्यार्थी तसेच पालक यांच्यामध्ये संभ्रम निर्माण होण्याची व त्यांच्यापर्यंत चुकीची माहिती पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालय/परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाकडून ज्या अध्यापकांना शिक्षक मान्यता मिळालेल्या आहेत अशाच मान्यताप्राप्त अध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये तात्काळ अद्ययावत करण्यात यावी. अन्यथा संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल, याची कृपया वेळीच नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७. )
जावक क्र. सीसीओ/४७०४ )
दि. ०५ डिसेंबर,२०२२. )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता कक्ष)

प्रत :

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२) मा. संचालक, सर्व मान्यता प्राप्त परिसंस्था